# औरंगाबाद महानगरपालिका औरंगाबाद

## दिनांक ७/८/२००७ रोजी संपन्न झालेल्या स्थायी समिती सभेचे (का.प.क्र.०७) इतिवृत्त

मंगळवार दिनांक **७ ऑगष्ट २००७** रोजी स्थायी समितीची सभा मा.सभापती **श्री. त्र्यंबक गणपतराव तुपे** यांचे अध्यक्षतेखाली महानगरपालिका मुख्य कार्यालयातील 'मलिक अंबर स्थायी समिती सभागृह' येथे **दुपारी ३.१० वाजता** "वंदे मातरम्" या गिताने सुरू झाली. या सभेस मा.आयुक्त, नगर सचिव व अधिकारी वर्गासह खालील सन्माननीय सभासद उपस्थित होते.

1. श्री. पुनमचंद सोनाजी बमणे
2. श्री. मधुकर दामोधर सावंत
3. श्री. संजय पांडूरंग शिरसाट
4. श्री. हिंमतराव साळूबा दाभाडे
5. श्री. अ. रशीद खान (मामु)
6. श्री. वसंत पांडूरंग नरवडे
7. श्रीमती जयश्री सारंग किवळेकर
8. श्री. कचरू विश्वनाथ मोरे
9. श्री. मो. जावेद मो. इसाक
10. श्री. अ. साजेद अ. सत्तार
11. श्री. हाजी शेरखान अ. रहेमान

**<u>संवाद :</u>**

श्री.अ.रशिद खान : भडकल गेट रस्त्यावर ब्रीज तुटलेले आहे. भडकलगेटमधून वाहतूक जस्त होते. गेटमध्ये रस्त्यावर खड्डे पडलेले आहेत. तात्काळ काम सूरू करावे शहरात अनेक रस्त्यावर मोठमोठे खड्डे पडलेले आहे.पॅचवर्क करण्यात यावे. शहानुरमिया दर्गा रस्त्यावर ट्रकचा धक्का लागून गेट तुटलेले आहे ते दुरूस्त करण्यात यावे.

मा. आयुक्त : शहानुरमियाँ दर्ग्याजवळचा गेट दगडाचा बांधण्याची कार्यवाही होईल १०० वर्ष टिकू शकतो. आपण वक्फ बोर्डाचे मुख्य अधिकारी यांचेशी या संदर्भात बोलावे.

मा. सभापती : पुलाचे काम त्वरीत हाती घेण्यात यावे. स.सदस्य श्री. अ.रशिद खान मामू यांनी केलेल्या सूचनाची प्रशासनाने दखल घ्यावी.

श्री.मधुकर सावंत : आजगरवारे येथे शालेय क्रिडा स्पर्धा होत आहे. महापालिकेच्या ८३ शाळा असून किती विदयार्थ्यानी सहभाग घेतलेला आहे.

मा.सभापती : फुटबॉलमध्ये महापालिकेचे विद्यार्थी नाही. अधिकारी क्रिडा स्पर्धेत आहे.

मा.आयुक्त : जिल्हा क्रिडा अधिकारी यांचे क्रिडा स्पर्धा आहे. क्रिडा विभागाचे श्री. मालोदे यांना सर्व माहिती आहे.

श्री. वसंत नरवडे : क्रिडा स्पर्धा चालू झालेल्या आहेत. महापालिकेचा सहभाग चांगला आहे.महापालिकेने शाळेसह इतर संघाने सहभाग घ्यावा. महापालिकेच्या शाळेचे नाव व्हावे.

श्री.हिम्मतराव दाभाडे : महापालिकेच्या शाळेचा दर्ज कसा वाढेल यासाठी प्रयत्न असावयास पाहिजेवार्ड क्र ९० मध्ये एकनाथनगर भागात महापालिकेच्या शाळेत फर्निचर नाही शिक्षकाची मागणी केली शिक्षकही दिलेले नाही. शाळेत स्वच्छतागृह नाही. तसेच शाळेत वाचमन यांना राहण्यास खोली नाही.

मा. आयुक्त : सर्वसाधारण सभेची मान्यता झाल्यानंतर वृत्तपत्रात जहिरात देवून येत्या २५ तारखेपर्यत शिक्षक देण्याची कार्यवाही होईल.

शिक्षणाधिकारी : स्वच्छतागृह करण्याची कार्यवाही पूढील महिण्यापासून सूरू होईल. इयत्ता ५ वी ते ७ वी पर्यतच्या विदयार्थ्यासाठी फर्निचरची मागणी मा. महापौर यांनी घेतलेल्या बैठकीत मान्य केलेली आहे. सदर कार्यवाही प्रोसेसमध्ये असून जर वॉचमन शाळेत राहण्यास तयार असेल तसेच जगा उपलब्ध असेल तर महापालिकेच्या बांधकाम विभागाकडे मागणी करून कार्यवाही करता येईल.

श्री.हिम्मतराव दाभाडे :तसेच शाळेच्या आवारात पेव्हींग ब्लॉक बसविण्याची कार्यवाही करावी.

मा.आयुक्त : तसे केल्यास विद्यार्थ्यांना खेळण्यासाठी अडचण होवू शकते.

श्री.हिम्मतराव दाभाडे : प्रकल्प विभागाकडे सर्वे करण्यात आला. एका संस्थेला काम दिले. ती संस्था पुन्हा सर्वेचे काम करणार काय?

प्रकल्प संचालक :मा. आयुक्तांनी नुकतीच मंजूरी दिली.स्थायी समितीच्या मान्यतेसाठी येणार आहे.

श्री.हिम्मतराव दाभाडे :श्री माधव घोरपडे यांनी १९८४ ला जगेचा महापालिकेकडून मोबदला घेतला त्यांना धनादेश दिलेला असून या संबधी माहिती मागविली होती. स्थायी समितीने यास मान्यताही दिली. या सभागृहात त्यावर अनेक वेळा चर्चा झाली. चौकशी करण्यासाठी मा. आयुक्त सुनावणी घेणार होते. केंव्हा सुनावणी होणार आहे याचा खूलासा करावा.

मा.आयुक्त : या संदर्भात दोन दिवसाच्या आत संबधीत श्री. घोरपडे व स. सदस्य यांना माझे दालनात बोलवून सुनावणी घेतली जईल.

श्री.हिम्मतराव दाभाडे : वार्ड कार्यालय फ च्या बाजूला लेडीजबार आहे. त्यांनी अतिक्रमण केलेले आहे. प्रशासनाचे याकडे लक्ष नाही का?

मा. सभापती : अतिक्रमण असेल तर आजच्या आजकार्यवाही करण्यात यावी.

**विषय क्र.85 :**

सहाय्यक संचालक नगर रचना, महानगरपालिका प्रस्ताव सादर करीत आहेत की, महानगरपालिकेच्या मालकीच्या मिळकती ज्यामध्ये मुख्यत: विकास योजनेने बाधीत आरक्षणे व अभिन्यासातील खुल्या जागा यांचा समावेश आहे अशा मिळकती कार्यालयाने संपादीत केल्या. परंतु अद्यापही काही मिळकतींची भूमी अभिलेख व महसूल अभिलेखात महानगरपालिकेच्या मालकीची नोंद काही प्रकरणात नगर भूमापन नकाशा, मोजणी नकाशा नाही. या सर्व प्रकरणांचा निपटारा करून त्या ठिकाणी महानगरपालिकेचे मालकीचे रेकॉर्ड, मोजणी नकाशा, ताबा इत्यादी सर्व अद्यावत करणे गरजेचे आहे. या कामासाठी सदरील क्षेत्रातील अनुभवी कर्मचाऱ्यांची आवश्यकता आहे. सदरचे काम हे भूमी अभिलेख/महसूल कार्यालयाशी संबंधीत असल्याने याच कार्यालयाच्या सेवानिवृत्त अधिकाऱ्यांचा उपयोग करून घेतल्यास, सुलभतेने व लवकर काम पूर्ण होऊ शकते. भूमी अभिलेख खात्याच्या खालील चार कर्मचाऱ्यांनी सहा महिन्यांसाठी ठराविक वेतनावर निव्वळ तात्पुरत्या नेमणुकीवर सदरचे काम करण्याची तयारी दर्शविली आहे. त्यांची नांवे पुढील प्रमाणे.

1. श्री. सुधाकर त्र्यंबकराव पांडव, सेवानिवृत्त (ता.नि.भू.अ.) सिल्लोड.
2. श्री. सुदर्शन माधवराव जोशी, सेवानिवृत्त (ता.नि.भू.अ.) पैठण.
3. श्री. चंद्रकांत नारायणराव रत्नपारखी, सेवानिवृत्त (मुख्यालय सहाय्यक, उपसंचालक भूमी अभिलेख कार्यालय) औरंगाबाद.
4. श्री. शेख रफीक अहमद शेख महेबुब, सेवानिवृत्त (ता.नि.भू.अ.) औरंगाबाद.

वरील चार अधिकारी हे निवृत्त शासकीय अधिकारी असून त्यांना निवृत्ती वेतन मिळते. करीता याबाबत त्यांना वेतन(शेवटचा पगार वजा सध्याचे निवृत्ती वेतन) अदा करावे लागेल. अंदाजे ही एकुण रक्कम रूपये 50,000/- प्रति महिना इतकी होईल. तसेच आवश्यकता भासल्यास या कामासाठी खाजगी एजन्सीचे सहाय्यक घेण्यात येईल. कार्यालयीन खर्च, आवश्यक साहित्य (स्टेशनरी, बिल्डींग, फोन, प्रवास इत्यादी व किरकोळ खर्च), पी.आर.कार्ड, 7/12 उतारा यांच्या प्रती काढणे, मोजणी नकाशा, नगर भूमापन नकाशा इत्यादी मिळविणे. आवश्यकता असल्यास सर्वेक्षणाकरीता तालुका निरीक्षक भूमी अभिलेख/नगर भूमापन कार्यालय यांच्याकडे शुल्क जमा करणे इत्यादी सर्व कामांसाठी रूपये 15,000/- प्रती महिना खर्चाच्या रक्कमेस मान्यता होणे आवश्यक आहे. केवळ 6 महिन्यांसाठी वरील निवृत्त अधिकाऱ्यांची तात्पुरती नेमणुक करावयाची आहे. करीता सदरील नेमणुकीला व खर्चाला मान्यता देण्यात यावी. प्रस्ताव मान्यतेसाठी सादर.

**<u>संवाद :</u>**

श्री.अ.रशिद खान : शेख तुराब शेख भिकन, सेवानिवृत्त स.ता.नि.भू.अ./शिरस्तेदार, औरंगाबाद यांना शहरातील जगेसंबधी चांगली माहिती आहे त्यांचे नाव यात समाविष्ठ करण्यात यावे.

श्री.कचरू मोरे : महापालिकेच्या मालमत्तेचा सर्वे करण्यासाठी तसेच इतर कामासाठी सहा महिण्यासाठी तात्पुरती नियुक्ती करणार आहोत. यासाठी दर महा ६५ हजर रू. खर्च होणार आहे. जेसेवानिवृत्त होतात त्यांची काम करण्याची क्षमता संपलेली असते. ते काम करण्यास सक्षम नसतात त्यांची बुध्दीमता कमी झालेली असते म्हणून शासन त्यांना सेवानिवृत्त करीत असते. सेवानिवृत्त अधिकारी यांना हे काम देणार आहोत. किती दिवसात किती काम करून घेणार, याचा मापदंड काय आहे याचा उल्लेख नाही. पीएमसी कडून काम करून घ्यावे जे प्रशिक्षित मुले असतात त्यांची काम करण्याची क्षमता असते.

श्री.अ.रशिद खॉन : नवीन प्रशिक्षीत लोकांना काम देण्यास दुमत नाही परंतू या शहराचा ज्यांना अभ्यास आहे, माहिती आहे ज्यांना सर्व सिटीसर्वे नंबर माहिती आहेत. अशाच लोकांकडून सर्वेचे काम करून घ्यावे लागणार आहे.

श्री.कचरू मोरे : अनुभव असलेले सूध्दा चूका करून ठेवतात. सातारा परीसरात १५० एकर जमिन नियमानूसार शहरात येते. परंतू त्यातील काही भाग सिटीसर्वे कार्यालयाकडून ग्रामंपचायतीमध्ये करून दिले. भूमि अभिलेख विभागाकडून शेजरचा गट नंबर ग्रामपंचायतीमध्ये समाविष्ट करणे कितपत योग्य आहे.

मा. आयुक्त : सहा महिण्यासाठी नियुक्त करणार आहोत. ज्या सेवानिवृत्त कर्मचारी/अधिकारी यांनी भूमि अभिलेख विभागात काम केलेले आहे अशा अधिकाऱ्यांकडून हे काम करून घेणे योग्य होईल. नवीन लोकांना माहिती उपलब्ध करून घेता येणार नाही, वेळ लागेल.

श्री.कचरू मोरे : जेसुशिक्षीत बेरोजगार आहे त्यांना काम मिळेल.

श्री.वसंत नरवडे : गुंठेवारी भागात डी. पी. प्लॅन नूसार रोडचे डिमार्केशन यांचेकडून करून घ्यावे.

श्री.मधुकर सावंत : १९८२ पासून महापालिका अस्तित्वात आली. मालमत्ता विभागाकडे यांची संपूर्ण माहिती असावयास पाहिजे होती. मालमत्ता विभागातील अधिकारी कर्मचारी यांनी आतापर्यंत रेकॉर्ड का ठेवले नाही. ज्यांनी काम केले नाही रेकॉर्ड ठेवले नाही त्यांचेवर काय कार्यवाही करणार आहोत. ज्यांनी काम केले नाही त्यांचे पगारातून या सेवानिवृत्त अधिकाऱ्यांचे मानधन देण्यात यावे.

श्री.संजय सिरसाट : क्रांतीचौक येथील महानगरपालिकेच्या जगेवरील अतिक्रमण काढून महापालिकेच्या नावावर करण्याची कार्यवाही करावी.

श्री.कचरू मोरे : श्री.सिकंदर अली हे कार्यक्षम अधिकारी आहेत त्यांचेकडे हे काम द्यावे. सदर जगा महापालिकेच्या मालकीची करतील.

मा. सभापती :स. सदस्य श्री. अ.रशिद खान यांनी सुचवले नांव श्री.शेख तुराब शेख भिकन, सेवानिवृत्त स.ता.नि.भू.अ./शिरस्तेदार, औरंगाबाद आणि श्री.एन.बी.रिंगणे, सेवानिवृत्त प्रमुख लिपीक, उपसंचालक भूमी अभिलेख कार्यालय, औरंगाबाद यांची नांवे समाविष्ट करून या दुरूस्ती सह प्रस्ताव मंजूर करण्यात येत आहे.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्यापमाणे व सभागृहात झालेल्या चर्चेप्रमाणे महानगरपालिच्या मालकीच्या व भुसंपादीत झालेल्या जागा महसूल व इतर अभिलेखात मालकी हक्कात होणेसाठी तसेच काही प्रकरणांत नगर भूमापन नकाशा, मोजणी नकाशा तयार करणे व मालकी हक्काचे अद्यावत अभिलेख व नकाशे तयार करणे तसेच मंजूर विकास योजनेचे प्रस्तावांची गुंठेवारी व जेथे आवश्यकता भासेल त्या भागात मोजणी नकाशांवर व जायमोक्यावर हद्दी-खुणा कायम करणे, आखीव पत्रिका, 7/12, मोजणी नकाशे, नगर भूमापन आलेखांच्या प्रती व उतारे काढणे, मोजणी फीस जमा करणे इ. कामांसाठी भूमि अभिलेख खात्याचे खालील सेवानिवृत्त अधिकाऱ्यांची रू.15,000/- प्रतीमहा प्रमाणे 6 महिन्यांकरीता तात्पुरती नेमणूक करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

1. श्री. सुधाकर त्र्यंबकराव पांडव, सेवानिवृत्त (ता.नि.भू.अ.) सिल्लोड.
2. श्री. सुदर्शन माधवराव जोशी, सेवानिवृत्त (ता.नि.भू.अ.) पैठण.
3. श्री. शेख रफीक अहमद शेख महेबुब, सेवानिवृत्त (ता.नि.भू.अ.) औरंगाबाद.
4. श्री. चंद्रकांत नारायणराव रत्नपारखी, सेवानिवृत्त (मुख्यालय सहाय्यक, उपसंचालक भूमी अभिलेख कार्यालय) औरंगाबाद.
5. श्री.शेख तुराब शेख भिकन, सेवानिवृत्त स.ता.नि.भू.अ./शिरस्तेदार, औरंगाबाद.
6. श्री.एन.बी.रिंगणे, सेवानिवृत्त प्रमुख लिपीक, उपसंचालक भूमी अभिलेख कार्यालय औरंगाबाद.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.86 :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केलेला आहे की, प्रभाग क्र.49 गुलमोहर कॉलनी अंतर्गत रस्त्याचे डांबरीकरण करणे या कामासाठी तयार करण्यात आलेल्या र.रू.9,95,650/- च्या अंदाजपत्रकास मंजुरी प्राप्त झाली आहे. सदर कामासाठी निविदापत्रके मागविली असता निविदा विक्रीच्या अंतिम तारखेपर्यंत एकूण 6 निविदा विकल्या गेल्या व निविदा स्विकृतीच्या अंतिम तारखेपर्यंत यापैकी एक निविदा दर भरून प्राप्त झाली. त्याचे दर खालील प्रमाणे आहेत. सदर रस्त्याची लांबी 615 मी. व रूंदी सर्वसाधारणपणे 4.50 मी. आहे. यापुर्वी सदर रस्त्याचे काम सिडको विभागामर्फे 3 वर्षापुर्वी करण्यात आलेले आहे.

1. ए. सी. कोठारी 7.99% जास्त दराने

वरील प्राप्त निविदा श्री.ए.सी.कोठारी यांची असून अंदाजपत्रकीय दरापेक्षा 7.99% जास्त दराची आहे. सदरील दराशी डांबराचे बाजार भावाप्रमाणे दर विचारात घेऊन तुलना केली असता सदरील दर योग्य

असल्याने सदर कामावर अंदाजपत्रकीय र.रू.9,95,650/- पेक्षा जास्त म्हणजेच रू.10,75,200/- एवढा खर्च होणार आहे. मा.आयुक्त यांनी सदर दरास शिफारस करून प्रस्ताव स्थायी समिती समोर सादर करण्याचे आदेशीत केलेले आहे.

तरी श्री.ए.सी.कोठारी यांच्याकडून सदरील काम अं.प.दरापेक्षा 7.99% जास्त दराने करून घेण्याकरीता प्रस्ताव विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर.

**संवाद :**

| | |
|---|---|
| श्री.संज्य सिरसाट | : या विषयी प्रशासनाचे मत घ्यावे नसता पून्हा दर वाढवून काम करून घेतले जते यात महापालिकेचे नुकसान होते. |
| मा. आयुक्त | : प्रशासनास योग्य वाटले तसेच सदर कामाचे अंदाजपत्रक हे १० लक्ष पेक्षा जस्त होत असल्याने सभागृहासमोर ठेवलेले आहे.. |
| मा. सभापती | : मान्यता देण्यात येते. |

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे प्रभाग क्र.49 गुलमोहर कॉलनी अंतर्गत रस्त्याचे डांबरीकरण करणे या कामासाठी प्राप्त झालेली श्री.ए.सी. कोठारी यांची अंदाजपत्रकीय दरापेक्षा 7.99% जास्त दराची निविदा स्विकारणेस सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.87 :**

अतिरिक्त शहर अभियंता, मनपा औरंगाबाद यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, प्रभाग क्र.26 गणेशनगर अंतर्गत विविध स्वयंविकसीत गृहनिर्माण संस्थे अंतर्गत रस्त्यांचे खडीकरण करणे या कामासाठी निविदापत्रक मागविले असता सर्वात कमी दराची म्हणजेच अं.प.दरापेक्षा 38.91% कमी दराची निविदा मंजुरीचा प्रस्ताव यापुर्वी सादर केला असता, स्थायी समिती सभा दि.29.5.07 विषय क्र.22 अन्वये सदरील निविदा रद्द करून फेरनिविदा मागविणे बाबत ठराव मंजूर केला होता. परंतु सदर कामाची फेरनिविदा मागविली असता जास्त दराची निविदा प्राप्त होण्याची दाट शक्यता आहे म्हणून सदर कामाच्या निविदा मंजुरीचा प्रस्ताव मा.स्थायी समिती समोर फेरविचारार्थ ठेवणेसाठी मा.आयुक्त यांनी आदेशीत केलेले आहे.

तरी सदरील कामाची मे.आर.के.कन्स्ट्रक्शन यांची अ.प.दरापेक्षा 38.91% कमी दराची निविदा मंजूरीस्तव प्रस्ताव मा.स्थायी समितीसमोर फेरविचारार्थ व मंजुरीस्तव सादर.

**संवाद :**

| | |
|---|---|
| अति.शहर अभियंता | : हा विषय स्थायी समितीपुढे आलेला होता त्यावेळी रद्द करण्यात आला. |
| श्री.संजय शिरसाट | : 38-39% कमी दराने काम करणे शक्य आहे का? अंदाजपत्रकाचा बेस काय? |
| अति.शहर अभियंता | : डी.एस.आर. योग्य आहे. |
| मा. आयुक्त | : त्यांनी रेट भरले, त्यांना समजते. आपल्याकडे सेक्युरिटी डिपॉझीट असते, ते करू शकले नाही तर ब्लॅकलिस्ट करता येईल. योग्य काम करून घ्यावे. |
| श्री.संजय शिरसाट | : 38-39% बिलो टाकतो. Calculation जमायला पाहिजे. Quality वर लक्ष द्यावे. |
| मा. सभापती | : स.सदस्यांच्या भावना लक्षात घेता सदरील काम स्पेसीफिकेशन प्रमाणे करून घेण्याची जबाबदारी संबंधीत अधिकारी यांची असेल. त्यानुसार कामावर संबंधीत अधिकारी यांनी नियंत्रण ठेवावे. थर्ड पार्टी इन्स्पेक्शन ठेवावे. काम चांगले झाले नाही तर संबंधीत ठेकेदारास ब्लॅकलिस्ट करावे. 15 दिवसांत कामास सुरूवात करावी. प्रस्ताव मंजुर करण्यात येतो. |

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे प्रभाग क्र.26 गणेशनगर अंतर्गत विविध स्वयंविकसीत गृहनिर्माण संस्थे अंतर्गत रस्त्यांचे खडीकरण करणे या कामासाठी सर्वात कमी दराची म्हणजेच अं.प.दरापेक्षा 38.91% कमी दराची मे.आर.के.कन्स्ट्रक्शन यांची निविदा स्विकारणेस सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. तसेच सभागृहात झालेल्या चर्चेनुसार थर्ड पार्टी इन्स्पेक्शन करावे, स्पेसीफिकेशनप्रमाणे काम करून घेण्याची जबाबदारी संबंधीत अधिकारी यांची राहिल. काम चांगले झाले नाही तर संबंधीत ठेकेदारास काळ्या यादीत टाकण्याची कार्यवाही करावी असे सर्वानुमते ठरले. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**<u>विषय क्र.88 :</u>**

कार्यकारी अभियंता पाणी पुरवठा प्रस्ताव सादर करतात की, बांधा, वापरा व हस्तांतरीत करा (B.O.T.) या तत्वावर संगणकीकृत निविदा पध्दती (E-Tendering) कार्यान्वीत करण्यासाठी मा.स्थायी समिती ठराव क्रमांक 297 दि.28/3/2006 नुसार मान्यता झाली. त्यानुसार मे.ढवंगळे इन्फोटेक यांचे मार्फत बांधा, वापरा, हस्तांतरीत करा या तत्वावर संगणकीय निविदा पध्दती कार्यान्वीत झाली.

इंटरनेटद्वारेच निविदा खरेदी करणे व इंटरनेटवरूनच निविदा दाखल करणेच्या पध्दतीस 11 मे 2007 पासून सुरूवात झाली व सदर यंत्रणा सद्य:स्थितीत सुरळीतपणे कार्यरत आहे.

सदर यंत्रणा औरंगाबाद महानगरपालिका व मे.ढवंगळे इन्फोटेक यांनी समन्वयाने तयार केली असून या यंत्रणेची सफलता पाहून शासकीय/निम शासकीय कार्यालयाकडून या यंत्रणेची मागणी होत आहे. सदर यंत्रणा कोल्हापूर महानगरपालिकेसाठी वापरण्याची परवानगी द्यावी अशी विनंती मे.ढवंगळे इन्फोटेक यांनी त्यांचा अर्ज दिनांक 4.8.2007 अन्वये केली आहे. करीता औरंगाबाद महानगरपालिकानी मे.ढवंगळे इन्फोटेक यांना समन्वय करार (Memorandum of understanding) करून परवानगी देऊ केल्यास कोल्हापुर महानगरपालिकेस वापरण्यास देता येणे शक्य आहे. अशा प्रकारच्या समन्वय करारातील मुख्य मुद्दे खालील प्रमाणे राहतील.

1. मे.ढवंगळे इन्फोटेक हे सदर यंत्रणा चालविण्यासाठी लागणारे सर्व साहित्य व यंत्रणा स्वखर्चाने पुरवेल व यासाठी पूर्ण Liability of and during implementation ही ढवंगळे इन्फोटेक यांची राहील.
2. ह्या यंत्रणेनुसार होणाऱ्या प्रत्येक व्यवहारासाठी कोल्हापुर महानगरपालिकडून किंवा कोणत्याही शासकीय किंवा निमशासकीय किंवा अशासकीय संस्थेकडून रूपये 197/- दर आकारण्यात येईल. लोगणारे सर्व साहित्य व यंत्रणा मे.ढवंगळे इन्फोटेक यांना पुरवावयाची असल्याने व ती यथायोग्य रित्या सांभाळावयाची व चालवावयाची असल्याने उक्त रूपये 197/- पैकी औरंगाबाद महानगरपालिकेसाठीचा लागू दर रूपये 160/- त्यांना मिळतील तर उर्वरीत रूपये 37/- औरंगाबाद महानगरपालिकेस मिळतील.
3. ह्या समन्वय कराराचा कालावधी 10 वर्षे राहील.

अशा प्रकारे समन्वय करार केल्यास औरंगाबाद महानगरपालिकेच्या उत्पन्नात वाढ होणार आहे. करीता मे.ढवंगळे इन्फोटेक यांचे समवेत समन्वय करार करण्यासाठीचा प्रस्ताव विचारार्थ सादर.

**<u>संवाद :</u>**

मा.आयुक्त : इनंटरनेटवर पैसे भरण्याची व्यवस्था होणार आहे. कोल्हापूर महापालिकेत ही पध्दत आहे.आपण १६० रु चार्ज आकारणार आहोत.रू.३७/-रॉयल्टी मिळणार आहे.इनंटरनेटवर झाल्यास स्टॅण्डर्ड होईल. शासनास कळविले आपण रॉयल्टी चार्ज करणार आहोत.

श्री.वंसत नरवडे :रॉयल्टी किती जमाझाली याचा अहवाल सभागृहासमोर यायला पाहिजे इ-टेंडरींगवर चर्चा झाली स्थायी समितीपासून या कामास सुरूवात झाली. प्रशासनाने ठेवलेला प्रस्ताव योग्य आहे. मान्यता देण्यास हरकत नसावी.

श्री.संजय सिरसाट : मा. आयुक्तांनी हा प्रस्ताव सादर करून एक चांगले काम सुरू केल्याबद्दल सभागृहाच्या वतीने त्यांचे अभिनंदन करतो.

मा.सभापती :मंजुरी देण्यात येते. वेळोवेळी सभागृहाला माहिती उपलब्ध करुन द्यावी.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे औरंगाबाद महानगरपालिका व मे.ढवंगळे इन्फोटेक यांनी समन्वयाने तयार केलेली संगणकीय निविदा पध्दती यंत्रणा कोल्हापूर महानगरपालिकेसाठी वापरण्याची परवानगी देण्यासाठी औरंगाबाद महानगरपालिकानी मे.ढवंगळे इन्फोटेक यांचे समवेत समन्वय करार (Memorandum of understanding) करण्यास प्रस्तावात नमुद केलेल्या अ.क्र.1 ते 3 च्या मुद्यास अनुसरून मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.89 :**

अतिरिक्त शहर अभियंता, महानगरपालिका औरंगाबाद यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, जिल्हा क्षयरोग केंद्र, औरंगाबाद या इमारतीचा काही भाग 224.41 चौ.मी. प्रस्तावित उड्डाण पुलात बाधीत होत असल्यामुळे बाधीत होणाऱ्या क्षेत्रफळापैकी 136.97 चौ.मी. बांधकाम महानगरपालिका संबंधीत आरोग्य विभागास करून देणार आहे. त्यासाठी या कामाचे ढोबळ अंदाजपत्रक श्री.गणेश म्हारोळकर, वास्तुशास्त्रज्ञ यांचे मार्फत अंदाजपत्रकीय दराच्या 1.5% दराने अंदाजपत्रक व नकाशे तयार करण्यात आलेले आहेत. त्याची ढोबळ रक्कम रू.19,79,250/- असून सदर कामास मा.आयुक्त यांनी शिफारस करून प्रस्ताव स्थायी समितीच्या मंजुरीस्तव सादर करण्याचे आदेशीत केले आहे.

तरी सदरील कामाचे अंदाजपत्रक रक्कम रू.19,79,250/- च्या मंजुरीस्तव प्रस्ताव विचारार्थ सादर.

**संवाद :**

मा.आयुक्त : टाऊनहॉल येथील रस्त्यावर उड्डाण पुलाचे काम चालू आहे. रस्त्यात जिल्हा क्षयरोग केंद्रांच्या इमारतीचा काही भाग बाधीत होत आहे. सदर इमारत साईडला करता येणार नाही त्यासाठी नवीन इमारत बांधून देणार आहोत. शासनास नुकसान भरपाई देत नाही. जशी इमारत होती तशीच बांधून देत आहोत. विषय क्र ९० मध्ये नगर नाका येथे हायमास्ट बसविण्याचा प्रस्ताव आहे त्यासही मान्यता द्यावी.

मा. सभापती : मान्यता देण्यात येते.

**ठराव :**

जिल्हा क्षयरोग केंद्र, औरंगाबाद या इमारतीचा काही भाग टाऊन हॉल येथील प्रस्तावित उड्डाण पुलात बाधीत होत असल्यामुळे, बाधीत होणाऱ्या क्षेत्रफळापैकी 136.97 चौ.मी. आकाराचे मनपातर्फे आरोग्य विभागास बांधकाम करून देण्याच्या कामासाठी तयाकर करण्यात आलेल्या रक्कम रू.19,79,250/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.90 :**

कार्यकारी अभियंता(जलनिःसारण, विद्युत, इमारती व उद्याने) यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, औरंगाबाद शहरातील नगर नाका चौक, बिबिका मकबरा चौक व चेलीपुरा पोलीस चौकी जवळ हायमास्ट बसविण्याचे अंदाजपत्रक र.रू.11,40,000/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आले असून, सदरील काम 15 ऑगष्ट पुर्वी करावयाचे असल्याने मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम 1949 चे कलम 5(2) 2 अन्वये उपलब्ध गुत्तेदार मे.बिटा इलेक्ट्रीकल्स, औरंगाबाद यांचेकडून अंदाजपत्रकीय दरापेक्षा 2% कमी दराने विना निविदा काम करून घेण्यास व त्यानुसार प्रस्ताव मान्यतेसाठी स्थायी समितीपुढे ठेवणेस्तव मा.आयुक्त यांनी शिफारस केली आहे.

करीता रक्कम रूपये 11,40,000/- चे अंदाजपत्रकास आणि मे.बिटा इलेक्ट्रीकल्स, औरंगाबाद यांचेकडून अंदाजपत्रकीय दरापेक्षा 2% कमी दराने विना निविदा काम करून घेणेच्या परवानगीसह प्रस्ताव विचारार्थ तथा मान्यतेस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे औरंगाबाद शहरातील नगर नाका चौक, बिबिका मकबरा चौक व चेलीपुरा पोलीस चौकी जवळ हायमास्ट बसविण्याचे कामासाठी तयार करण्यात आलेल्या र.रू.11,40,000/- चे अंदाजपत्रकास तसेच सदरील काम 15 ऑगष्ट पुर्वी करावयाचे असल्याने मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम 1949 चे कलम 5 (2) 2 अन्वये उपलब्ध गुत्तेदार मे.बिटा इलेक्ट्रीकल्स, औरंगाबाद यांचेकडून अंदाजपत्रकीय दरापेक्षा 2% कमी दराने विना निविदा काम करून घेण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.91 :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केलेला आहे की, मे.अजिंठा इन्फ्रास्ट्रक्चर प्रायव्हेट लिमिटेड, गोल्डनड्रीम, डी-5, एपीआय कंपाऊंड वॉल, एमआयडीसी चिकलठाणा, औरंगाबाद यांनी एम.ओ.यु. तत्वावर जालना रोडपासुन एम.आय.डी.सी. पाण्याच्या टाकीपर्यंत व पुढे वोखार्ड रिसर्च सेंटर पर्यंत 30 मी. रूंद रस्त्याचे खडी रस्ता व डांबरीकरण, फुटपाथ तसेच डिव्हायडर बांधणे, स्ट्रीट लाईट, बस स्टॉप, तसेच वाहतुक बेट इत्यादी बांधण्यासाठी परवानगी मागितलेली आहे.

दि.25/9/2006 च्या सर्वसाधारण सभेत विकास योजनेतील महानगरपालिकेच्या प्रस्तावित रस्त्याचे कोणी व्यक्तीने, विकासकाने, संस्थेने, कंपनीने महानगरपालिकेने निर्धारीत केलेल्या प्रमाणकानुसार जागेवर विकसीत करून दिल्यास सदरील कामाचे पुर्णत्वाचे प्रमाणपत्र सादर केल्यानंतर पुढील 5 वर्षात मिळणाऱ्या निव्वळ मालमत्ता कराच्या रक्कमेतून या रक्कमेच्या 75% पर्यंत प्रत्यक्ष विकासासाठी झालेल्या खर्चाची रक्कम समायोजीत करता येईल, तसेच रस्त्याच्या कामाचे पुर्णत्वाचे प्रमाणपत्र सादर केल्याच्या तारखेपासुन पुढे 5 वर्ष देखभाल दुरूस्तीची जबाबदारी संबंधीत विकासकावर राहील, असा ठराव मंजुर झालेला आहे.

मे. अजिंठा इन्फ्रास्ट्रक्चर प्रायव्हेट लिमिटेड यांनी एम.आय.डी.सी. चिकलठाणा येथील रस्ता विकसीत करण्यासाठी परवानगी मागितलेली असुन, महानगरपालिकेबरोबर रस्ता विकासाबाबत करारनामा करावयाचा आहे, सदर करारनाम्यातील अटी खालील प्रमाणे राहतील.

1. प्रस्तावित रस्त्याच्या सर्व कामाचे डिझाईन हे इंडियन रोड कॉंग्रेसच्या मानकाप्रमाणे व राष्ट्रीय महामार्गाच्या दर्जाप्रमाणे राहील.
2. प्रस्तावित रस्त्याच्या सर्व कामाचे डिझाईन हे महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळातील मान्यताप्राप्त प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार यांच्या मार्फत करावे लागेल तसेच काम हे प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार यांच्या देखरेखीखाली पुर्ण करण्यात येईल.
3. शहर अभियंता, महानगरपालिका औरंगाबाद हे, विकासकाने सादर केलेले रस्त्याचे डिझाईन व सविस्तर अंदाजपत्रक यांची छाननी करून त्यांच्या तांत्रिक मान्यतेनंतरच काम करण्याची परवानगी राहिल.

तरी उपरोक्त प्रमाणे प्रस्ताव मा.स्थायी समिती समोर मान्यतेस्तव सादर.

**संवाद :**

मा. आयुक्त :शहरातील प्रमुख रस्ते चांगले करण्याचे धोरण सर्वसाधारण सभेने ठरविले.डी.पी रस्ता विकसीत करण्यासाठी वेळ लागतो. रस्ता विकसीत झाल्यानंतर बाजूचे लोक त्यांची किमत वाढवून मागतात. रस्त्याचा खर्च .विकासकाने करावा व पूढील पाच वर्षात झालेला खर्चाच्या एकूण ७५ टक्के खर्च हा मालमत्ता कराच्या माध्यमातून .समायोजीत करता येईल पूढील पाच वर्ष देखभाल दुरूस्तीची जबाबदारी संबधीत विकासकावर राहील. रस्ता हा इंडियन रोड कॉग्रेसच्या मानकाप्रमाणे राहिल. पीएमसी त्यानी नियुक्त करावी एकूण खर्चाच्या ७५ टक्के खर्च विकास शुल्क मालमत्ता कराच्या माध्यमातून समायोजीत करायचा आहे सवलत द्यायची आहे.

श्री.संजय शिरसाट : ५०० ते १०० फुटापर्यंत एखादा बिल्डर रस्ता विकसीत करेल. त्यानंतर तेथील आजूबाजूच्या जगेची भरमसाठ किमती वाढेल. इतरबाकीची वसूली करण्याचा प्रयत्न केला तर ती वसूली होणार नाही. बाजूला ज्यांची जगा आहे त्यांना याचा फायदा होईल.

मा. आयुक्त : इम्पॅक्ट टॅक्स महापालिकेने वसूल करावे. ते कन्सेप्ट सर्वसाधारण सभेपूढे सादर करणार. आता ज्यांना पाहिजेत्यांनी करावा.

श्री.संजय शिरसाट : एखादयाने एकच कि.मी. त्यांचे प्रॉपर्टीसाठी विकास केला तर पूढील विकास कोण करेल.

मा. आयुक्त : मालकी महापालिकेची राहिली विकासकाने विकास करावा. जगा संबधीतांनी ट्रान्सफर करावी मालकी हक्काबद्दल स्पेशल लिहून घेता येईल.

मा. सभापती : मालकी हक्काबाबत वगैरे सर्व नियमानुसार करून दुरूस्तीसह यास मान्यता देण्यात येते.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे व सभागृहात झालेल्या चर्चेनुसार जालना रोडपासुन एम.आय.डी.सी. पाण्याच्या टाकीपर्यंत व पुढे वोखार्ड रिसर्च सेंटर पर्यंत 30 मी. रूंद रस्त्याचे खडी रस्ता व डांबरीकरण, फुटपाथ तसेच डिव्हायडर बांधणे, स्ट्रीट लाईट, बस स्टॉप, तसेच वाहतुक बेट इत्यादी बांधून रस्ता विकसीत करण्यासाठी, मे.अजिंठा इन्फ्रास्ट्रक्चर प्रायव्हेट लिमिटेड, गोल्डनड्रीम, डी-5, एपीआय कंपाऊंड वॉल, एमआयडीसी चिकलठाणा, औरंगाबाद यांना एम.ओ.यु. तत्वावर प्रस्तावातील अटी शर्तीच्या अधीन राहून सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

## ऐनवेळचे विषय

**विषय क्र.92 :** (दि.17.7.2007 च्या सभेत स्थगित ठेवण्यात आलेला विषय क्र. 66)

शहर अभियंता, मनपा औरंगाबाद प्रस्ताव सादर करीत आहे की, कलाई महिला विकास बहुउद्देशीय संस्था, औरंगाबाद यांना कै. मिनाताई ठाकरे सभागृह, अयोध्यानगर, एन-7 म्हाडा कॉलनी, ज्याचे क्षेत्रफळ 205.72 चौ.मी. असून त्यास मा.आयुक्त व मा.स्थायी समिती यांनी सदरील सभागृह संस्थेस प्रति माह भाडे रू.1000/- व अनामत रक्कम रू.12000/- तसेच सेवा शुल्क रू.5/- प्रती चौ.मी. व प्रचलित अटी शर्ती नुसार सदर संस्थेस भाड्याने देणेस यापुर्वी मान्यता दिलेली आहे.

सदरील संस्थेने दि.6-7-2007 रोजी विनंती अर्ज देवुन सदरील हॉल 29 वर्षाकरीता भाडेतत्वावर देणे बाबत विनंती केलेली आहे व त्यास मा.आयुक्त, महानगरपालिका औरंगाबाद यांनी मान्यता दिलेली आहे. मा.स्थायी समितीची मान्यता झाल्यास सदरील प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेसमोर ठेवणेस्तव सादर.

तसेच या जागे करीता सेवा शुल्क रू.5/- प्रति चौ.मी. प्रति माह व जागेचा मालमत्ता कर जो नियमाप्रमाणे येईल तो संबंधीत संस्थेस भाड्याच्या व्यतिरिक्त भरणा करावा लागेल.

या कार्यालयास ज्यावेळी इमारतीची आवश्यकता वाटेल तेव्हा सदरील इमारत महानगरपालिकेच्या ताब्यात घेण्यात येईल. मा.स्थायी समितीची मान्यता झाल्यास एक वर्षाचे आगाऊ भाडे, अनामत रक्कम व सेवा शुल्कचा भरणा करून तसेच करारनामा करून भाड्याने देण्यात येईल.

करीता सदरील प्रस्ताव विचारार्थ तथा मान्यतेस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे कै. मिनाताई ठाकरे सभागृह, अयोध्यानगर, एन-7 म्हाडा कॉलनी येथील हॉल कलाई महिला विकास बहुउद्देशीय संस्था, औरंगाबाद यांना संस्थेस प्रति माह भाडे रू.1000/- व अनामत रक्कम रू.12000/- तसेच सेवा शुल्क रू.5/- प्रती चौ.मी. व प्रचलित अटी शर्ती नुसार 29

वर्षाकरीता भाडेतत्वावर देण्यास मंजुरी देण्यात येऊन सर्वसाधारण सभेस शिफारस करण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**संवाद :**

श्री.संजय शिरसाट : कोकणवाडी चौकात चांगले डेव्हलप करण्यासाठी स्वेच्छानिधीतून चार ते साडेचार लक्ष घेवून तसेच महापालिका फडांतील काही रक्कम घेवून असे आठ ते साडेआठ लक्षचे कामास मान्यता द्यावी अशी विनंती आहे.

मा. सभापती : स.सदस्य श्री.संजय शिरसाट यांनी सूचना केल्यानुसार कोकणवाडी चौक विकसीत करण्याचे कामास त्यासाठी लागणाऱ्या खर्चासह मान्यता देण्यात येते.

**विषय क्र.93 :**

कोकणवाडी चौकाचे सुशोभिकरण करणे, सदरील चौक चांगला विकसीत करण्यासाठी स्वेच्छा निधीतून चार ते साडेचार लक्ष घेवून तसेच मनपा फंडातून काही रक्कम घेऊन आठ ते साडेआठ लक्ष चे विकास काम करण्यास मंजुरीस्तव प्रस्ताव सादर.

सुचक : संजय शिरसाट                अनुमोदक : मधुकर सावंत

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे कोकणवाडी चौक चांगला विकसीत करण्यासाठी स.सदस्य श्री.संजय शिरसाट यांचे स्वेच्छा निधीतून चार ते साडेचार लक्ष घेवून तसेच मनपा फंडातून काही रक्कम घेऊन आठ ते साडेआठ लक्ष चे विकास काम करण्यास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

राष्ट्रगीतानंतर सभा संपल्याचे मा. सभापती यांनी घोषीत केले.

**नगर सचिव**
महानगरपालिका औरंगाबाद